<table>
<tr><td rowspan="5">MHSN090012832012</td><td>दाखल दिनांक –</td><td colspan="3">१६.०१.२०१२</td></tr>
<tr><td>नोंदणी दिनांक –</td><td colspan="3">१८.०२.२०१४</td></tr>
<tr><td>निकाल दिनांक –</td><td colspan="3">२५.०६.२०२६</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी –</td><td>वर्षे</td><td>महिने</td><td>दिवस</td></tr>
<tr><td>१४</td><td>०५</td><td>०९</td></tr>
</table>

सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जि. सांगली यांच्या न्यायालयात

(पिठासीन अधिकारी – श्री. सतीश य. वाकचौरे)

संक्षिप्त दिवाणी दावा क्रमांक – ०१/२०१४ **निशाणी क्र. ६७**

विश्वास नारायण पाटील.
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती, ... **वादी**
रा. आळते, ता. तासगांव, जि. सांगली.

विरूध्द

नेताजी अमृता गवळी.
वय : ५१ वर्षे, धंदा : शेती, ... **प्रतिवादी**
रा. आळते, ता. तासगांव, जि. सांगली.

दावा :– रक्क्म रू.१,६०,०००/– वसूल होऊन मिळणेसाठी.

वादीतर्फे विधीज्ञ : श्री. बी. एन. शाळगांवकर.
प्रतिवादी तर्फे विधीज्ञ : श्री. बी. बी. पाटील.

न्यायनिर्णय

(घोषित दिनांक २५.०६.२०२६)

वादीने प्रस्तुतचा रक्कम रू.१,६०,०००/- प्रतिवादीकडून वसूल होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादीचे थोडक्यात कथन असे आहे की,

वादी व प्रतिवादी हे एकाच गावातील असून त्यांचे एकमेकांशी मित्रत्वाचे संबंध होते. त्यांचे एकमेकांकडे जाणे-येणे व गरजेला एकमेकांकडे आर्थिक मदत मागणे असे जवळचे संबंध होते. दिनांक ०१.०८.२००९ रोजी प्रतिवादीने वादीकडे द्राक्षबाग लागवडीसाठी रक्कम रु.१,६०,०००/- मागितले. वादीने श्री. महादेव बापू सुर्यवंशी यांच्यासमक्ष प्रतिवादीला सदर रक्कम दिली. तेव्हा प्रतिवादींनी तीस दिवसाच्या आत रक्कम परत देण्याचे मान्य व कबूल केले. परंतु, त्याप्रमाणे त्याने वादीला रक्कम दिली नाही. वादीने वेळोवेळी पैशाची मागणी केली असता प्रतिवादीने दिनांक ०९.११.२००९ रोजी सांगली सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा - आळते या बँकेच्या रक्कम रु.१,६०,०००/- चा धनादेश क्रमांक SBZ129314 हा वादीला दिला. तो धनादेश बँकेत भरला असता दिनांक १४.११.२००९ रोजी तो न वटता परत आला. त्यानंतर दिनांक

०२.१२.२००९ रोजी वादीने प्रतिवादीला वकीलामार्फत नोटीस पाठविली. नोटीस मिळाल्यानंतरही प्रतिवादीने पैसे दिले नाहीत. तसेच, नोटीसला उत्तरही दिले नाही. म्हणून वादीला रक्कम रू.१,६०,०००/– ही द.सा.द.शे. १२% व्याजाप्रमाणे वसूल होऊन मिळण्याकरीता प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले आहे. यास्तव वादीने प्रस्तुतचा दावा मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादीने निशाणी क्र.३१ अन्वये कैफियत दाखल करून दाव्यातील संपूर्ण कथन नाकारले आहे. प्रतिवादी पुढे असे कथन करतो की, वादी व प्रतिवादी दोघे एकाच गावचे रहिवासी असून ते वादीच्या ट्रॅक्टर, जीप व पाण्याचा टँकर या वाहनावर चालक म्हणून मजूरी करत होते. प्रतिवादी यांची आळते गावी स्वतःची शेती असून त्यामध्ये त्यांना द्राक्षबागेची लागण व उभारणी करीता जिल्हा मध्यवर्ती बँकेतून कर्ज मंजूर करून देतो असे सांगून त्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे वादीने प्रतिवादीकडून मागवून घेतले होते. सदर कर्ज प्रकरणासाठी जामीन राहतो व त्याकरीता तुम्हाला काही धनादेश द्यावे लागतील असे सांगून वादीने प्रतिवादीचे सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा – आळते या बँकेचे धनादेश पुस्तक घेतले व त्यामधून धनादेश क्र. SBZ129311 व 129314 हे काढून घेतले व स्वतःकडे ठेवले. वादींनी प्रतिवादीचे कर्ज प्रकरण बँकेकडे सादर

केले नसल्याने ते धनादेश स्वतःकडे ठेवले. त्यानंतर प्रतिवादींनी त्याबाबत वेळोवेळी विचारणा केली असता वादींनी उडवाउडवीची उत्तरे दिली. म्हणून प्रतिवादीने नाराज होऊन वादीचे चालक म्हणून असलेले काम सोडले. प्रतिवादी कामाला येत नाही म्हणून वादीने त्याचा राग मनात धरून त्यांचे मित्र महादेव बापू सुर्यवंशी यांच्या मदतीने प्रतिवादीस त्रास देण्याच्या उद्देशाने एस.सी.सी. क्र. २८८/२००९ ही केस प्रतिवादींविरुद्ध दाखल केली होती. त्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर होऊन न्यायालयाने प्रतिवादीची निर्दोष मुक्तता केली आहे.

०४. प्रतिवादी पुढे असे कथन करतो की, वादीने स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा – विटा या बँकेमध्ये त्याच्या खात्यामध्ये धनादेश क्र. SBZ129311, रक्कम रू.१,१२,०००/– व धनादेश क्र. SBX129314 हा रक्कम रू.१,६०,०००/– हे दोन धनादेश जमा केले असता व ती दोन्ही न वटता परत आल्याचे दिसून येते. परंतु, वादीने धनादेश क्र. SBZ129311 बाबत कोणतेही विधान जाणीवपूर्वक केलेले नाही. तसेच, वादीचे दाव्यातील कथनाप्रमाणे प्रतिवादी हा रक्कम रू.१,६०,०००/– चे देणे लागत असताना वादीने रक्कम रू.२,७२,०००/– चे धनादेश बँकेत का भरले याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. किंबहुना ती वस्तुस्थिती वादीने न्यायालयापासून लपवून ठेवली आहे. वादी हा स्वच्छ हाताने

न्यायालयात आलेला नाही. प्रतिवादीने दिनांक ०९.०२.२०१० रोजी त्याचे खोटे कारण सांगून घेतलेले धनादेश वादीने परत द्यावे म्हणून वादीला नोटीस पाठविली होती. सदर नोटीस मिळूनही वादीने त्यास कोणतेही उत्तर दिले नाही. प्रतिवादी हे वादीस कोणतेही कायदेशीर देणे लागत नाहीत. प्रतिवादीचे धनादेश वादीने फसवूण घेतलेले आहेत व ते स्वतःकडे असल्याचा गैरफायदा वादी घेत आहेत. यास्तव त्यांनी सदरचा दावा नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०५. वादीतर्फे विधीज्ञ श्री. बी. एन. शाळगांवकर यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी युक्तिवादादरम्यान त्यांच्या दाव्यातील कथनांची पुनरावृत्ती करून खालीलप्रमाणे न्यायनिर्णयांवर आपली भिस्त ठेवली आहे.

i. ***Sh. Vishnu Dutt Sharma Vs. Smt. Daya Sapra*** *[2009(6)* ***ALL MR*** *436].*

ii. ***Laxuman S/o. Dadarao Bodake*** *&* ***Ors. Vs. Vithal S/o. Dadarao Bodake*** *&* ***Ors.****, [2008(3)* ***B C J*** *106]*

iii. ***Union of India*** *&* ***Anr. Vs. M/s. K. C. Sharma and Co.*** *&* ***Ors.****, [2020* ***Supreme(SC)*** *486]*

iv. ***Uttam Ram Vs. Devinder Singh Hudan*** *&* ***Anr.,***

[2020 **ALL MR SCR (Cri)** 64].

v. ***Hiten P. Dalal Vs. Bratindranath Banerjee, [AIR 2001 SUPREME COURT** 3897]*

०६. प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. बी. बी. पाटील यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी युक्तिवादादरम्यान त्यांच्या कैफियतमधील कथनांची पुरनावृत्ती करून संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२८८/२००९ या प्रकरणामध्ये न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली आहे. त्यामुळे प्रतिवादी हा वादीस कोणतीही रक्कम लागत नाही असे सांगून प्रस्तुतचा दावा नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०७. वादी व प्रतिवादी यांची परस्परविरोधी कथने व दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे वाद प्रश्न माझ्यासमोर उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणमिमांसेच्या आधारे नोंदविले आहेत.

अ.क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१	वादीने रक्कम रू.१,६०,०००/- हे प्रतिवादीला हात उसणे म्हणून दिले होते, हे वादी सिध्द करतो काय ?	नकारार्थी.
२	हात उसणे घेतलेली रक्कम प्रतिवादीने त्यांच्यामध्ये ठरल्याप्रमाणे वादीस परत केली नाही, हे वादी सिद्ध	नकारार्थी

	करतो काय ?	
३	दाव्यातील मागणीप्रमाणे रक्कम वसूल होऊन मिळण्यास वादी पात्र ठरतो काय ?	नकारार्थी
४	कोणता आदेश व हुकुमनामा	दावा अंतिम आदेशाप्रमाणे नामंजूर करण्यात येतो.

कारणमिमांसा

०८. वादीने दाव्यातील कथने सिद्ध करण्यासाठी स्वतःला साक्षीदार क्र.१ म्हणून निशाणी क्र.३३ अन्वये तसेच, संजय शिवाजी पाटील, साक्षीदार क्र.२ यांना निशाणी क्र.४१ अन्वये तपासले आहे. या व्यतिरिक्त वादीने आपली भिस्त निशाणी क्र.३४ वरील जिल्हा मध्यवर्ती बँकेचा धनादेश व मेमो, निशाणी क्र.३५ वरील भारतीय स्टेट बँक या बँकेचा मेमो व निशाणी क्र.३६ वरील भारतीय स्टेट बँकेमध्ये धनादेश भरल्याची पावती या कागदपत्रांवर ठेवली आहे. निशाणी क्र.४१ अन्वये पुरसिस दाखल करून वादीने त्यांचा पुरावा बंद केला आहे.

०९. प्रतिवादीने त्याची कैफियतीमधील कथने सिद्ध करण्याकरीता स्वतःला साक्षीदार क्र.१ म्हणून निशाणी क्र.४२ अन्वये, तसेच बबन नाना गवळी यांना साक्षीदार क्र.२ म्हणून निशाणी क्र.५१ अन्वये तपासले आहे. सदर तोंडी

पुराव्या व्यतिरिक्त प्रतिवादीने आपली भिस्त निशाणी क्र.५६ वरील भूमापन क्र.१९९ चे सन २००१–०२ ते सन २०११–१२ रोजीचे जुने ७/१२ उतारे, निशाणी क्र.६५ वरील फेरफार क्र.३७६८ व निशाणी क्र.६६ वरील संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२८८/२०१० मधील न्यायनिर्णयाची साक्षांकित प्रत या कागदपत्रांवर ठेवली आहे. निशाणी क्र.५५ अन्वये पुरसिस दाखल करून प्रतिवादीने त्यांचा पुरावा बंद केला आहे.

मुद्दा क्र. १ ते ३ करीता

१०. वाद प्रश्न १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांच्या पुराव्याची व कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते मी एकत्रित विचारात घेत आहे.

११. प्रतिवादीतर्फे वकीलांनी युक्तिवादादरम्यान असे सांगितले आहे की, वादीने प्रतिवादीला कधीही हात ऊसणे पैसे दिलेले नाही. वादीकडे प्रतिवादीला देण्यासाठी रक्कम रू.१,६०,०००/– उपलब्ध होते हे दाखविण्यासाठी त्यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही, ही बाब प्रतिवादीने स्वतःच त्याच्या उलटतपासामध्ये मान्य केली आहे. तसेच, निशाणी क्र.६५ वरील फेरफार क्र.३३६८ अन्वये वादीने थकीत कर्ज भरले नाही म्हणून श्री. सिद्धेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेने वादीच्या मिळकतीवर जप्ती आदेशाची नोंद केली आहे.

त्यामुळे, ज्या व्यक्तिने कर्ज भरले नाही म्हणून संस्थेने त्याच्या मिळकतीवर जप्ती आदेशाची नोंद केली असेल असा व्यक्ति रक्कम रू.१,६०,०००/- हात उसणे कसा देऊ शकतो. त्यामुळे, वादीने रक्कम रू.१,६०,०००/- प्रतिवादीला हात उसणे दिले होते हे कथन विश्वासार्ह नाही. यावरून वादीची प्रतिवादीला हात ऊसणे रक्कम देण्याची ऐपत नव्हती हे स्पष्ट होते.

१२. त्याअनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, दिनांक ०१.०८.२००९ रोजी वादीकडे रक्कम रू.१,६०,०००/- उपलब्ध होते हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा वादीने अभिलेखावर दाखल केलेले दिसून येत नाही. परंतु, विश्वास पाटील, वादीतर्फे साक्षीदार क्र.१ वादी स्वतः यांनी त्यांच्या तोंडी पुराव्यामध्ये त्यांनी दिनांक ०१.०८.२००९ रोजी प्रतिवादीला द्राक्षबाग लागवडीसाठी रक्कम रू.१,६०,०००/- हात उसणे दिले होते. तसेच, उलटतपासामध्ये तो प्रतिष्ठीत घरातील व्यक्ति आहे असे सांगितले आहे. वादीतर्फे साक्षीदार क्र.२ संजय पाटील यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये वादीची आर्थिक परिस्थिती पूर्वीपासून चांगली आहे. त्यांच्या शेतात पूर्वीपासून द्राक्षबाग आहे असे कथन केले आहे. तसेच, प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.२ बबन गवळी यांनी देखील त्यांच्या पुराव्यामध्ये वादी यांची गावात द्राक्षबाग व ऊस शेती आहे असे पुराव्यादरम्यान

सांगितले आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या निशाणी क्र.३१ अन्वये दाखल केलेल्या कैफियतीमध्ये तसेच, पुराव्यामध्ये ते वादीच्या ट्रॅक्टर, जीप व पाण्याचा टँकर या वाहनांवर चालक म्हणून काम करत होता असे कथन केले आहे. जप्ती आदेशाबाबत वादीने निशाणी क्र.६२ च्या फेरिस्त यादीसोबत श्री. सिद्धेश्वर पतसंस्थेचे पत्र दाखल केले आहे. त्यामध्ये वादी हा श्री. अरुण बाळासाहेब पाटील यांना कर्जासाठी जामीनदार होता व त्याचे कर्ज थकबाकीत गेल्याने संस्थेने जामीनदार म्हणून वादीच्या मिळकतीवर जप्ती आदेशाची नोंद केली होती व ते कर्ज भरल्यानंतर ती पुन्हा कमी केले आहे असे स्पष्टपणे नमूद आहे. यास्तव वरील सर्व पुराव्यावरून वादीची आर्थिक परिस्थिती चांगली होती व त्यामुळे त्याची रक्कम रू.१,६०,०००/– हात उसणी देण्याची ऐपत होती ही बाब सिद्ध होते.

१३. वादीने प्रतिवादीला रक्कम रू.१,६०,०००/– हात उसणे दिले होते व ती रक्कम प्रतिवादीने ठरल्याप्रमाणे वादीस परत केली नाही ही बाब सिद्ध करण्याची संपूर्ण जबाबदारी वादीची आहे. त्याअनुषंगाने अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता निशाणी क्र.३४ वरील धनादेश क्र.SBZ129314 यावर वादीचे नाव नमूद असल्याचे दिसते. प्रतिवादीने पुराव्यामध्ये सदर धनादेश व त्यावरील त्याची सही ओळखली. तसेच, सदर केस

त्या धनादेशाबाबत असल्याचेही मान्य केले. प्रतिवादीचा बचाव असा आहे की, वादीने कर्ज मंजूर करून देतो असे सांगून प्रतिवादीचे दोन धनादेश स्वतःकडे ठेवले होते व त्याचा गैरवापर घेऊन धनादेश क्र.SBZ129314 बाबत यापूर्वी संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२८८/२००९ हा दाखल केला होता. त्यामध्ये प्रतिवादीला न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे व त्यानंतर वादीने सदर दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने धनादेश क्र.SBZ129311 ची वस्तुस्थिती न्यायालयापासून लपवून ठेवली आहे. वादीने त्याच्या उलटतपासामध्ये त्याने धनादेश क्र.SBZ129311 व धनादेश क्र.SBZ129314 हे दोन धनादेश स्वतःकडे ठेवून घेतले होते ही बाब स्पष्टपणे नाकारली आहे व पुढे प्रतिवादीने त्याला एकच धनादेश दिला होता व तोच त्याने त्याच्या खात्यावर वटण्यासाठी बँकेत भरला होता असे सांगितले आहे. त्याबाबत अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा पाहिला असता निशाणी क्र.३४ च्या धनादेशासोबत वादीने दाखल केलेला जिल्हा मध्यवर्ती बँकेचा मेमो व निशाणी क्र.३५ वरील भारतीय स्टेट बँकेचा मेमो या दोन्ही मेमोवर धनादेश क्र.SBZ129311 व धनादेश क्र.SBZ129314 हे न वटता परत आल्याचे नमूद आहे. हे दोन्ही मेमो वादीने अभिलेखावर दाखल केले आहेत. तरीही वादी तोंडी पुराव्यामध्ये धनादेश क्र.SBZ129311 बाबतची वस्तुस्थिती स्पष्टपणे नाकारत आहे. यावरून वादीच्या हेतूबाबत संशय निर्माण होतो.

१४. निशाणी क्र.३४ व ३५ वरील मेमोवरून असे दिसते की, धनादेश क्र.SBZ129311 हा रक्कम रू.१,२०,०००/- व धनादेश क्र.SBZ129314 हा रक्कम रू.१,६०,०००/- हे दोन्ही धनादेश वादीने वटण्यासाठी त्याच्या खात्यावर भरले होते व ते दोन्ही न वटता परत आलेले होते. त्या दोन्ही धनादेशाची एकूण रक्कम रू.२,७२,०००/- होती. वादीने दाव्यामध्ये प्रतिवादीला रक्कम रू.१,६०,००/- हात उसणे दिले होते व तेव्हढीच रक्कम प्रतिवादी हा त्याला देणे लागतो असे कथन केले आहे. मग वादीने रक्कम रू.२,७२,०००/- साठीचे प्रतिवादीच्या खात्याचे धनादेश वटण्यासाठी स्वतःच्या खात्यावर का भरले होते, याचे कोणतेही स्पष्टीकरण वादीने दाव्यामध्ये अगर पुराव्यामध्ये दिलेले दिसून येत नाही. वादीतर्फे वकीलांनी युक्तिवादादरम्यान असे सांगितले की, जरी वादीने दुसऱ्या धनादेशाचा उल्लेख केला नसला तरी त्याचा परिणाम या धनादेशातील रकमेवर अगर त्याच्या वसूलीवर होणार नाही. कोणत्या धनादेशची रक्कम वसूल करून मागायची हा सर्वस्वी वादीचा अधिकार आहे. त्याप्रमाणे त्याने धनादेश क्र.SBZ129314 मध्ये नमूद असलेल्या रकमेसाठी वसूलीचा दावा दाखल केला आहे. वादीच्या वकीलांनी असे कथन केले असले तरी वादीने दाव्यामध्ये सदर दोन्ही धनादेशाची वस्तुस्थिती मांडणे आवश्यक होते किंवा धनादेश क्र.SBZ129311 याची वस्तुस्थिती प्रस्तुत दाव्यामध्ये का नमूद केले नाही याचे

स्पष्टीकरण देणे आवश्यक होते. परंतु, वादीने अगर वादीतर्फे वकीलांनी तसे कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. यावरून वादी स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेला नाही हे स्पष्ट होते.

१५. पुढे वादीने त्याचे व प्रतिवादीचे मैत्रीचे संबंध होते, त्यांचे एकमेकांकडे जाणे–येणे होते व अडीअडचणींना तो प्रतिवादीला मदत करत होता असे कथन करून त्याने दिनांक ०१.०८.२००९ रोजी महादेव बापू सुर्यवंशी यांच्यासमक्ष प्रतिवादीस रक्कम रू.१,६०,०००/– हात उसणे दिले असे कथन केले आहे. परंतु, वादीने महादेव बापू सुर्यवंशी या साक्षीदाराला न तपासता संजय शिवाजी पाटील साक्षीदार क्र.२ याची साक्ष घेतली आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यामध्ये दिनांक ०१.०८.२००९ रोजी तो वादीच्या घरी असताना तेथे प्रतिवादी हजर होता व त्याच्यासमक्ष वादीने प्रतिवादीला रक्कम रू.१,६०,०००/– नवीन द्राक्षबाग घालण्यासाठी दिले होते असे कथन केले आहे. परंतु, दाव्यामध्ये व पुराव्यामध्ये वादीने प्रतिवादीला साक्षीदार संजय पाटील यांच्यासमक्ष रक्कम दिली होती असे कथन कोठेही केलेले नाही. महादेव बापू सुर्यवंशी हे मयत आहेत असे कथन साक्षीदार क्र.२ संजय पाटील यांनी केले आहे. परंतु, ते दिनांक ०१.०८.२००९ रोजी वादीच्या घरी पैसे देताना हजर होते असे कोणतेही विधान

त्यांनी पुराव्यादरम्यान केलेले नाही. वादी व वादीतर्फे साक्षीदाराच्या पुराव्यामधील तफावत पाहता त्यांचा अभिलेखावर आलेला पुरावा हा विश्वसनीय वाटत नाही. त्यांच्या पुराव्यामध्ये कोणतीही विश्वासार्हता दिसून येत नाही.

१६. वरील विवेचनावरून वादीने धनादेश क्र.SBZ129311 बाबतची लपवून ठेवलेली वस्तुस्थिती, तसेच, वादीने रक्कम देताना हजर असलेल्या साक्षीदाराचे दाव्यात नमूद केलेले नाव व पुरावा यामधील तफावत व वादींनी रक्कम रू.२,७२,०००/– साठी दोन धनादेश त्याच्या खात्यावर का भरले होते याचे कोणतेही न दिलेले स्पष्टीकरण यावरून वादीने रक्कम रू.१,६०,०००/– हे प्रतिवादीला हात उसणे दिले होते व त्यांच्यामध्ये ठरल्याप्रमाणे प्रतिवादी हा वादीचे देणे लागतो या दाव्यातील कथनांवर संशय निर्माण होतो. दिवाणी दाव्यामध्ये केवळ वादीकडे धनादेश आहे म्हणून **पराक्रम्य संहिता अधिनियम, १९८१ चे कलम १३९** अन्वये असलेले गृहीतक वापरून सादर केलेला धनादेश हा कर्जाच्या व दायित्वाच्या निर्वाहासाठी आहे असे म्हणून प्रतिवादी हा वादीचे देणे लागतो असा निष्कर्ष नोंदविणे उचित होणार नाही.

१७. उपरोक्त नमूद **विष्णू** या न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने कर्जाच्या परतफेडीसाठी धनादेश दिल्यानंतर त्या कारणास्तव तक्रार फेटाळली

असेलतर त्याबाबत दिवाणी कार्यवाही चालू ठेवल्यास त्यास रेस–जुडीकाटा या संज्ञेची बाधा येत नाही असा निष्कर्ष नोंदविला आहे. तसेच, उपरोक्त नमूद **लक्ष्मण** या न्यानिर्णयामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने दाव्यामध्ये अगर कैफियतीमध्ये कथने स्पष्टपणे नमूद नसतील तर त्याबाबत तोंडी पुरावा ग्राह्य धरता येणार नाही असा निष्कर्ष नोंदविला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी हा त्याने प्रतिवादीला पैसे उसणे दिले होते व ठरल्याप्रमाणे प्रतिवादीने ते त्याला परत दिले नाही हे सिद्ध करण्यास अपयशी ठरला आहे. यास्तव सदर दोन्ही न्यायनिर्णयामध्ये नोंदविलेल्या निष्कर्षाचा प्रस्तुत दाव्यामध्ये उपयोग होताना दिसत नाही.

१८. उपरोक्त नमूद **युनियन ऑफ इंडिया, उत्तमराम व हितेन** या न्यानिर्णयांमधील केसची वस्तुस्थिती व प्रस्तुत दाव्यातील वस्तुस्थिती या वेगवेगळ्या आहेत. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी त्याची केस शाबीत करण्यास अपयशी ठरला आहे. यास्तव सदर न्यायनिर्णयांमध्ये नोंदविलेल्या निष्कर्षांचा प्रस्तुत दाव्यामध्ये उपयोग होताना दिसत नाही.

१९. एकंदर दाव्यातील कथने व अभिलेखावरील पुरावा यावरून वादी हा स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेला नाही ही बाब स्पष्ट होते. यास्तव प्रस्तुतचा दावा नामंजूर होण्यास पात्र ठरतो. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर 'नकारार्थी'

नोंदवून मुद्दा क्र. ४ चे उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. प्रस्तुतचा दावा खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

२. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत व घोषीत करण्यात आला)

SATISH YASHWANT WAKCHAURE
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.06.25 17:19:45 +0530

तासगांव **(एस.वाय. वाकचौरे)**

दिनांक : २५.०६.२०२६. **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, तासगांव.**

प्रमाणपत्र

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव	–	श्रीमती. ए. एम. चव्हाण.
न्यायालय	–	सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली.
दिनांक	–	२५.०६.२०२६.
न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक	–	२५.०६.२०२६.
आदेश अपलोड दिनांक	–	२५.०६.२०२६.